ePaper

## दिल्ली पोलिसांची अभिजित दीपकेसोबतच्या आंदोलकांना मारहाण



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 03 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

पुणे-नाशिक महामार्गाला निधीचा 'ऑक्सिजन' द्या!

### मोदींकडून जपानच्या महिला पंतप्रधानांचे भावनिक स्वागत

# 'माझी लहान बहीण..'



महाईन्यूज । नवी दिल्ली

**भारत आणि जपानमधील राजनैतिक संबंधांमध्ये आज एक अत्यंत भावनिक आणि ऐतिहासिक प्रसंग पाहायला मिळाला. १६ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान साने ताकाईची यांचे स्वागत करताना, त्यांचा उल्लेख अत्यंत आपुलकीने 'माझी लहान बहीण' असा केला.**

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि शील नागू यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने या टप्प्यावर शिक्षेला स्थगिती देण्यास नकार देत कारागृह प्रशासनाला आसारामला आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच राजस्थान सरकारला दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे.

आसारामच्या वतीने ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांनी तो ८० वर्षांहून अधिक वयाचा असून विविध आजारांनी त्रस्त असल्याने जामीन मंजूर करावा, अशी मागणी केली. मात्र, केवळ वय किंवा आजारपण हा जामिनाचा आधार ठरू शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने ही मागणी फेटाळली.

यापूर्वी २७ मे रोजी राजस्थान उच्च न्यायालयाने आसारामची दोषी ठरवण्याची कारवाई आणि जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली होती. अल्पवयीन मुलीवरील बलात्काराशी संबंधित भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एफ) अंतर्गत त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली आहे. तसेच पोक्सो कायद्यातील काही कलमांखालील दोषी ठरवण्याचा निर्णयही कायम आहे. मात्र, सामूहिक बलात्कार आणि गुन्हेगारी कटासह काही आरोपांतून त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती.

हे प्रकरण २०१३ मधील असून, आश्रमात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याचा आरोप आसारामवर आहे. या प्रकरणात २५ एप्रिल २०१८ रोजी कनिष्ठ न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर राजस्थान उच्च न्यायालयानेही ती शिक्षा कायम ठेवली. आता सर्वोच्च न्यायालयानेही तातडीचा दिलासा नाकारल्याने आसारामला आणखी एक मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे.

### AI ते बायोगॅस; सहकार्याला नवी दिशा



भारत-जपान शिखर परिषदेत AI, संरक्षण, सेमीकंडक्टर्स, हरित ऊर्जा आणि गुंतवणूक क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याचा निर्णय झाला. तसेच देशभरात १,००० बायोगॅस व सेंद्रिय खत प्रकल्प उभारण्याची घोषणा करण्यात आली. पुढील दशकात भारतात १० ट्रिलियन येन जपानी गुंतवणूक आकर्षित करण्याचे लक्ष्यही निश्चित करण्यात आले.

दोन्ही देशांमधील वाढत्या आर्थिक भागीदारीवर बोलताना पंतप्रधानांनी सांगितले की, "आज भारत आणि जपान या दोन्ही अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये गणल्या जातात. गेल्या वर्षभरात दोन्ही देशांत १२० नवीन व्यावसायिक करार झाले असून, याद्वारे भारतात १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त जपानी गुंतवणूक येणार आहे. पुढील दशकात जपानमधून भारतात १० ट्रिलियन येनची गुंतवणूक आकर्षित करणे आणि जपानी कंपन्यांची संख्या दुप्पट करणे हे आमचे लक्ष्य आहे."

या परिषदेत तंत्रज्ञान आणि अपारंपरिक ऊर्जेवर विशेष भर देण्यात आला. या अंतर्गत संपूर्ण भारतात १,००० बायोगॅस आणि सेंद्रिय खत प्रकल्प उभारण्यासाठी 'भारत-जपान बायोगॅस उपक्रमा'ची घोषणा करण्यात आली.

तत्पूर्वी, सकाळी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात पंतप्रधान साने ताकाईची यांचे औपचारिक आणि दिमाखदार स्वागत करण्यात आले. बदलत्या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी दोन्ही देश आपली 'विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी' अधिक मजबूत करत आहेत. जपानच्या पंतप्रधान साने ताकाईची १ ते ३ जुलै दरम्यान भारताच्या दौऱ्यावर असून, दोन्ही देशांमधील हा नवा संवाद इंडो-पॅसिफिक क्षेत्रात शांतता आणि प्रगतीचा नवा अध्याय सुरू करेल.

# खडकवासलात अखेर पाण्याचा श्रीगणेशा

## आणखी दोन महिने पुरेल एवढा पाणीसाठा; गेल्या ३६ तासांत जमा झाले ०.१५ टीएमसी पाणी

**महाईन्यूज । पुणे**

**उशीरा दाखल झालेला मॉन्सून त्यातही अत्यल्प पावसाची हजेरी, यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पात आतापर्यंत केवळ ०.१५ टीएमसी पाणी जमा झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे पाणीसाठ्याचा या निमित्ताने श्रीगणेशा झाला आहे. त्यामुळे चारही धरणांमध्ये असलेला १३ टक्के अर्थात ३.८१ टीएमसी पाणीसाठा शहराला पुढील दोन महिने पुरेल इतका आहे.**



तर गेल्या ३६ तासांत जमा झालेले ०.१५ टीएमसी पाणी शहराला तीन दिवस पुरेल एवढे आहे. दरम्यान, गेल्या दहा वर्षांचा १ जुलैच्या पाणीसाठ्याच्या तुलनेत गेल्या वर्षांचा अपवाद वगळता ५ ते ३० टक्के पाणीसाठा होता. गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्याने ५१ टक्के साठा चारही धरणांत होता.

गेल्या दोन दिवसांपासून खडकवासला प्रकल्पाच्या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाला पुन्हा सुरुवात झाली आहे. त्यामुळे गुरुवारी (दि. २) सकाळी ६ वाजता संपलेल्या २४ तासांत पहिल्यांदा पाण्याचा येवा सुरू झाला. त्यानुसार १०२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा जमा झाला. तर गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४० दशलक्ष घनफूट पाणीजमा झाले, अशी माहिती खडकवासला प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी दिली. जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ३५ मिलिमीटर पाऊस झाला. धरण परिसरात आतापर्यंत एकूण २०२ मिलिमीटर पाऊस पडला आहे. वरसगाव धरण क्षेत्रात ९ (एकूण १५८), पानशेत धरण क्षेत्रात ९ (१६३) तर खडकवासला धरण क्षेत्रात २ मिलिमीटर तर एकूण ९८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. शहरात गेल्या पंधरवड्यात दिवसाआड पाणी पुरवठा सुरू असल्याने अनेक भागात पुणेकर त्रस्त झाले आहेत. खडकवासला प्रकल्पात २ जुलैला ३.८१ टीएमसी पाणीसाठा आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या १० वर्षांच्या आकडेवारीनुसार यंदाचा पाणीसाठा पाचव्या क्रमांकाचा आहे. या प्रकल्पात २०१६, २०१९ आणि २०२२ मध्ये यंदाच्या साठ्यापेक्षाही कमी अर्थात तीन टीएमसीपेक्षाही कमी पाणीसाठा होता. तर २०२५ मध्ये सर्वाधिक ५१.१२ टक्के अर्थात १४.९० टीएमसी पाणीसाठा होता. सर्वात कमी २.५५ टीएमसी अर्थात ८.७५ टक्के पाणीसाठा २०२२ मध्ये होता.

### ऑगस्ट अखेरपर्यंत पुरेल पाणीसाठा

दरम्यान, खडकवासला प्रकल्पात सध्या असलेले पाणी ऑगस्ट अखेरपर्यंत पुरेल. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जून महिन्यात सुमारे पुरेशा पावसाची नोंद झाली नाही. परिणामी पाणीसाठ्यात वाढ झाली नाही. दरवर्षी १० जुलै ते १० ऑगस्ट या दरम्यान पर्जन्यवृष्टी होते. तसाच जोरदार पाऊस यंदाही झाल्यास, धरणांच्या जलाशयात मोठा पाणीसाठा होईल. त्याकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

त्या तुलनेत यंदाचा ३.८१ अर्थात १३ टक्के पाणीसाठा चांगला आहे, असे म्हणता येईल.

# हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा पहिला टप्पा जुलै तर दुसरा टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू व्हावा

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा पहिला टप्पा जुलै महिन्यात आणि दुसरा टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरु करून नागरिकांना दिलासा द्यावा. त्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर कामे पूर्ण करावे, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत केली.**



हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यान धावणारी मेट्रो सेवा १५ जुलै २०२६ पासून सुरू होईल, अशी प्रशासनाकडून आशा व्यक्त केली जात होती. पण तसे होताना दिसत नाही. या प्रकल्पासाठी गेल्या काही वर्षांत अनेक तारखा जाहीर करण्यात आल्या, मात्र प्रत्येक वेळी नवीन तारीख पुढे आली, असे आमदार शिरोळे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करत सांगितले.

पहिली अपेक्षित तारीख मार्च २०२३, त्यानंतर मार्च २०२५, त्यानंतर एप्रिल २०२६ मध्ये ९४ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा, त्यानंतर ३१ मे २०२६ डेडलाइन देण्यात आली होती आणि सध्याची तारीख डेडलाईन १५ जुलै २०२६ आहे. पण, प्रत्यक्षात कामे पूर्णत्वाची जाहीर केलेली एकही तारीख पूर्ण झाली नाही. आणि आत्ताची तारीख पण पूर्ण होताना दिसत नाही.

त्यामुळे लवकरात लवकर राहिलेली अपूर्ण कामे युद्धपातळीवर पूर्ण करून हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा पहिला टप्पा जुलै महिन्यात आणि दुसरा टप्पा डिसेंबरपर्यंत पूर्ण करावा. त्या मार्गावरून मेट्रो धावू लागावी आणि नागरिकांना दिलासा मिळावा, असे आमदार शिरोळे यांनी सांगितले.

# जगातील १२ प्रज्ञावंत शास्त्रज्ञांत पुण्यातील डॉ. सौमित्र आठवले

**महाईन्यूज । पुणे**

पुण्याचे युवा वैज्ञानिक डॉ. सौमित्र आठवले यांची अमेरिकन केमिकल सोसायटी च्या संशोधन पत्रिकेने जाहिर केलेल्या जागतिक पातळीवरील प्रतिष्ठीत 'टॅलेंट १२' या मानाच्या यादीत निवड झाली आहे.

'टॅलेंट १२' हा उपक्रम रसायनशास्त्र शाखेत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी घेतला जातो. यंदा जगातून सुमारे ५४० नामांकने आली होती.त्यातून फक्त १२ वैज्ञानिकांची निवड झाली.यात पुण्यातील डॉ.सौमित्र आठवले यांचा समावेश आहे. त्यांच्या संशोधनाची माहिती केमिकल अँड इंजिनिअरिंग न्यूजच्या विशेषांकात नुकतीच प्रसिध्द झाली आहे.डॉ.आठवले हे पुण्यातील आयसर (राष्ट्रीय विज्ञान संस्था) चे विद्यार्थी असून सध्या कॅलिफोर्निया विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करतात.त्यांचे शालेय शिक्षण अभिनव शाळेत झाले आहे.



# पुणे-नाशिक महामार्गाला निधीचा 'ऑक्सिजन' द्या!

## भूसंपादनासाठी PCMC व PMRDA ने पुढाकार घ्यावा; आमदार महेश लांडगे यांची भूमिका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड–राजगुरूनगर या महत्त्वाच्या मार्गाच्या रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला तातडीने गती देण्याची मागणी विधानसभा सभागृहात औचित्याच्या मुद्द्याद्वारे करण्यात आली. राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होईपर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) यांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून भूसंपादनाची प्रक्रिया त्वरित पूर्ण करण्याची मागणी आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात केली.**




> “पुणे–नाशिक महामार्ग हा केवळ वाहतुकीचा मार्ग नसून पिंपरी-चिंचवड, चाकण, खेड-राजगुरूनगर आणि संपूर्ण औद्योगिक पट्ट्याच्या विकासाचा कणा आहे. रखडलेल्या भूसंपादनामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प विलंबित होत आहे. राज्य शासन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए यांच्या समन्वयातून आवश्यक निधी उपलब्ध करून भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण व्हावी, यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल, उद्योगांना नवी गती मिळेल आणि लाखो नागरिकांचा वेळ, इंधन व आर्थिक खर्च वाचेल. नागरिकांच्या हितासाठी हा प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, हीच माझी सर्वोच्च प्राथमिकता आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने औचित्याच्या मुद्द्याद्वारे आमदार महेश लांडगे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्ग हा पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, खेड-राजगुरूनगर तसेच राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांना जोडणारा महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून या महामार्गाच्या रुंदीकरण व उन्नतीकरणासाठी प्रयत्न सुरू असून, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या मार्गाचे एलिव्हेटेड कॉरिडॉरमध्ये रूपांतर करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रियाही सुरू आहे.

मात्र, प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये भूसंपादनाचा प्रश्न सर्वात मोठा अडथळा ठरत असल्याचे सभागृहात निदर्शनास आणून देण्यात आले. वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे नाशिक फाटा ते चाकण आणि खेड या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. अवघे ३० किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी नागरिकांना दोन ते तीन तासांचा कालावधी लागत असून, त्यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक नुकसान होत आहे.

### भूसंपादन रखडल्याने प्रकल्प ठप्प

पुणे–नाशिक महामार्गाच्या नाशिक फाटा ते खेड-राजगुरूनगर दरम्यानच्या भूसंपादन प्रक्रियेला विलंब होत असल्याने महामार्गाच्या रुंदीकरण आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाची अंमलबजावणी रखडली आहे. त्यामुळे दररोज होणारी वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय, इंधनाचा वाढता खर्च आणि औद्योगिक वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी भूसंपादन तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर, भूसंपादन प्रक्रियेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाकडून निर्णय होईपर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए यांनी त्यांच्या अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. त्यामुळे रखडलेली भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण होऊन महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या प्रकल्पाची वेळेत अंमलबजावणी झाल्यास वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच पिंपरी-चिंचवड, चाकण, खेड-राजगुरूनगर परिसरातील औद्योगिक, व्यापारी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळून नागरिक, उद्योजक आणि उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार असल्याचेही सभागृहात नमूद करण्यात आले.

# जमिनीच्या वादातून शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुखाकडून गोळीबार!






**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सुस-नांदे रोडवरील एका बांधकाम साईटवर जमिनीच्या वादातून शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख बाळासाहेब चांदेरे यांनी पिस्तुलातून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. २) पहाटे घडली. या प्रकरणी बावधन पोलिसांनी चांदेरे आणि त्यांचा सहकारी संदेश माने यांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.**

या प्रकरणी नागेश मोहन राठोड (वय २१, रा. नऱ्हे) यांनी बावधन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चांदेरे व माने यांच्याविरुद्ध मारहाण, धमकी, शस्त्र कायद्याचे उल्लंघन आणि महाराष्ट्र पोलिस अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे नागेश राठोड, राहुल सरकार आणि मेहबूब शेख हे सुसगाव येथील बांधकाम साईटवर असताना पांढऱ्या रंगाच्या फॉर्च्युनरमधून बाळासाहेब चांदेरे तेथे आले. संबंधित जमिनीच्या वादातून दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर चांदेरे यांनी पिस्तूल बाहेर काढल्याचा आरोप आहे.


### जीव वाचवण्यासाठी ओढ्यातून पळ

पिस्तूल रोखल्याचे पाहताच तिघांनी जीवाच्या भीतीने घटनास्थळावरून धूम ठोकली. काही अंतरावर गेल्यानंतर गोळीबाराचा आवाज ऐकू आला. त्यानंतर त्यांनी सुसगाव स्मशानभूमीजवळील ओढ्यातून पळ काढत डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच बावधन पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले.

पिस्तूल पाहताच नागेश राठोड, राहुल सरकार आणि मेहबूब शेख यांनी जीवाच्या भीतीने घटनास्थळावरून पळ काढला. काही अंतरावर गेल्यानंतर त्यांना गोळीबाराचा आवाज ऐकू आला. मेहबूब शेख यांनी तातडीने डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच बावधन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक बालाजी ठाकूर करीत आहेत. या घटनेनंतर बावधन-सुस परिसरातील वाढत्या जमीन वादाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका प्रमुख राजकीय पदाधिकाऱ्याचे नाव थेट गोळीबाराच्या गुन्ह्यात समोर आल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

> गुरुवारी रात्री एकच्या सुमारास बाळासाहेब चांदेरे याने गोळीबार केल्याची माहिती समोर आली. पोलिसांना माहिती कळताच तातडीने चांदेरे आणि त्यांचा सहकारी माने याला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.
>
> **- अरविंद पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, बावधन पोलिस ठाणे.**





## भूमिका

**मराठी रंगभूमीला आधुनिक विचार, अभ्यासपूर्ण दिग्दर्शन आणि जागतिक दृष्टी देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून विजया मेहता यांचे नाव सदैव आदराने घेतले जाईल. त्यांचे निधन म्हणजे केवळ एका ज्येष्ठ दिग्दर्शिकेचा अंत नाही, तर मराठी नाट्यविश्वातील एका युगाचा पडदा पडल्याची भावना आहे.**

# विचारांना रंगमंच देणाऱ्या विजयाबाई

अभिनय, दिग्दर्शन आणि नाट्यविचार या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान मराठी रंगभूमीच्या इतिहासात अजरामर राहील.

विजया मेहता यांनी नाटकाकडे केवळ मनोरंजनाचे माध्यम म्हणून पाहिले नाही. प्रत्येक नाटकामागे एक विचार, एक सामाजिक संदर्भ आणि मानवी मनाचा शोध असतो, ही जाणीव त्यांनी कलाकार आणि प्रेक्षक दोघांनाही करून दिली. पात्राच्या संवादांइतकेच त्याचे भावविश्व समजून घेण्याचा आग्रह त्यांनी धरला. त्यामुळे त्यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेले प्रत्येक नाटक आशय, अभिनय आणि सादरीकरणाच्या दृष्टीने वेगळे ठरले.



त्यांनी मराठी रंगभूमीला जागतिक नाट्यपरंपरेशी जोडले. पाश्चात्त्य रंगभूमीतील नवे प्रयोग, ब्रेख्तसारख्या विचारवंतांचा प्रभाव आणि आधुनिक दिग्दर्शनशैली यांचा अभ्यास करून त्यांनी त्याचे मराठी संस्कृतीशी सुसंगत रूपांतर केले. हमीदाबाईची कोठी, वाडा चिरेबंदी, अखेरचा सवाल, अजब न्याय वर्तुळाचा, एक शून्य बाजीराव यांसारख्या नाटकांमधून त्यांनी आशयाला केंद्रस्थानी ठेवणारी रंगभाषा निर्माण केली.

विजया मेहता यांच्यावर कधी डावेपणाचे, तर कधी अभिजनवादाचे आरोप झाले. मात्र त्यांनी कोणत्याही चौकटीत स्वतःला बंदिस्त होऊ दिले नाही. त्यांनी नवोदित कलाकारांना संधी दिली, विविध प्रवाहातील लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि रंगभूमीवर सातत्याने नवे प्रयोग घडवून आणले. अभ्यास, शिस्त आणि कलात्मक प्रामाणिकपणा हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख राहिली.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल माध्यमांच्या युगात कलाक्षेत्र झपाट्याने बदलत आहे. अशा काळात विजया मेहता यांनी दिलेला विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. कोणतेही माध्यम बदलले तरी कलेचा आत्मा हा मानवी संवेदनशीलतेत आणि सर्जनशीलतेत असतो, याची त्यांनी आपल्या कार्यातून जाणीव करून दिली.

विजया मेहता यांचे कार्य हे मराठी रंगभूमीची अमूल्य सांस्कृतिक संपत्ती आहे. त्यांनी घालून दिलेली विचारशील, अभ्यासपूर्ण आणि प्रयोगशील परंपरा पुढील पिढ्यांनी जपणे, हाच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही; मात्र त्यांनी दिलेला नाट्यविचार आणि कलादृष्टी मराठी रंगभूमीला कायम प्रेरणा देत राहील.

## प्रासंगिक »

### परोपकार

**एका गावात एक गरीब पण दयाळू माणूस राहत होता. एकदा एका श्रीमंताने त्याला स्वादिष्ट जेवण दिले. एवढे अन्न पाहून त्याने ते घरी नेण्याची परवानगी घेतली.**

वाटेत भेटलेल्या भिकाऱ्याला त्याने त्यातील काही अन्न दिले. घरी पोहोचल्यावर एक भिक्षुक आला, त्यालाही त्याने आपल्या वाट्यातील अन्न दिले. त्यानंतर एक अपंग व्यक्ती आली, तिलाही त्याने उरलेले अन्न दिले. आता स्वतःसाठी फक्त पाणी उरले होते. तेवढ्यात एक वृद्ध तहानलेला माणूस आला. गरीबाने क्षणाचाही विचार न करता ते पाणीही त्याला दिले. स्वतः उपाशी राहूनही चार जणांची भूक-तहान भागवल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर होता.

क्षणात देव प्रकट झाले. त्यांनी सांगितले की, भिकारी, भिक्षुक, अपंग आणि वृद्ध या सर्व रूपांत तेच आले होते. त्याच्या निःस्वार्थ परोपकाराने प्रसन्न होऊन देवाने त्याला आयुष्यभर कधीही कोणत्याही गोष्टीची कमतरता भासणार नाही, असा आशीर्वाद दिला.

**- तात्पर्य : दुसऱ्याला मदत करण्यात आणि वाटून खाण्यातच खरे सुख दडलेले असते.**

कोणत्याही देशाच्या विकासाचा पाया अचूक आणि विश्वासार्ह आकडेवारीवर उभा असतो. शासनाच्या योजना आखण्यापासून त्यांची अंमलबजावणी, परिणामांचे मूल्यमापन आणि भविष्यातील धोरणनिर्मितीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सांख्यिकी महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे देशाची सांख्यिकी व्यवस्था ही केवळ प्रशासकीय बाब नसून राष्ट्रीय संपत्ती मानली जाते.

# विश्वासार्ह सांख्यिकी हीच विकासाची गुरुकिल्ली



पंतप्रधानांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा यांनी भारतीय सांख्यिकीला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याची व्यक्त केलेली भूमिका या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सांख्यिकी व्यवस्थेची भक्कम पायाभरणी झाली. पी. सी. महालनोबिस यांच्या मार्गदर्शनाखाली उभारलेली सांख्यिकी व्यवस्था जगभरात विश्वासार्ह मानली जात होती. मर्यादित साधनसामग्री असूनही भारतातील माहिती संकलन आणि विश्लेषणाची गुणवत्ता उच्च दर्जाची होती. त्यामुळे भारतीय आकडेवारीवर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वास ठेवला जात असे.

मात्र, गेल्या काही वर्षांत विविध सर्वेक्षणे, आर्थिक निर्देशांक आणि माहिती संकलन प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित झाले. काही अहवाल मागे घेणे, सांख्यिकी पद्धतींमध्ये झालेले बदल आणि सरकारी आकडेवारीवरील वाढता अविश्वास यामुळे भारताच्या सांख्यिकी व्यवस्थेवर टीका झाली. ही परिस्थिती कोणत्याही लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. कारण चुकीच्या किंवा अपुऱ्या आकडेवारीवर आधारित धोरणे जनहित साधू शकत नाहीत.

आज शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च होत आहेत. मोफत धान्य, महिलांसाठी आर्थिक मदत, स्वच्छता अभियान किंवा इतर सामाजिक योजना यांचा खरा लाभ किती गरजूंपर्यंत पोहोचतो, निधीचा प्रभावी वापर होतो का, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन अचूक सांख्यिकीशिवाय अशक्य आहे. त्यामुळे पारदर्शक आणि स्वतंत्र माहिती संकलन ही काळाची गरज बनली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डेटा-आधारित प्रशासनाच्या युगात सांख्यिकीचे महत्त्व आणखी वाढले आहे. अचूक डेटा असलेले देशच भविष्यातील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करू शकतील. त्यामुळे सरकारने सांख्यिकी व्यवस्थेची विश्वासार्हता, पारदर्शकता आणि स्वायत्तता जपणे आवश्यक आहे. विश्वासार्ह आकडेवारी हीच सुशासनाची खरी ओळख असून, "जे अचूक मोजता येते, तेच प्रभावीपणे सुधारता येते," हे तत्त्व भविष्यातील विकासाचे मार्गदर्शक ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥

घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रम्ह ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मॅनहोल दुर्घटनेवर नार्वेकरांचा सवाल

## मुंबईतल्या साकीनाका भागात मॅनहोलमध्ये पडून अस्लम शेख या व्यक्तीचा मृत्यू

महाईन्यूज । मुंबई

**मुंबईतील साकीनाका परिसरात मॅनहोलमध्ये पडल्याने ५५ वर्षीय अस्लम शेख या व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मुंबईत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, राजकीय वातावरणही चांगलंच तापलं आहे. मुंबईचे उपमहापौर संजय घाडी यांनी मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दुसरीकडे अश्विनी भिडे यांनी या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली आहे.**



तसंच या ठिकाणी जाळी बसवण्याचं काम सुरु होतं त्याचवेळी दुर्घटना घडली असंही अश्विनी भिडेंनी म्हटलं आहे. तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या विधान परिषदेचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी एक पोस्ट लिहिली आहे आणि या घटनेसाठी अश्विनी भिडेंनाच कसं जबाबदार धरता येईल असा प्रश्न विचारला आहे.

मॅनहोल दुर्घटना ही नक्कीच संतापजनक असून दोषी स्थानिक अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे. परंतु, या दुर्घटनेसाठी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनाच जबाबदार धरले जाणे कितपत योग्य आहे? स्थानिक स्तरावरील हलगर्जीपणा आधी तपासला गेला पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे. अशी पोस्ट मिलिंद नार्वेकर यांनी केली आहे.

साकीनाका येथील खैरानी रोडवर गुरुवारी सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली. एका खासगी कंत्राटदाराकडून देखभालीचे काम सुरू असताना मॅनहोलचे झाकण उघडे ठेवण्यात आले होते. परंतु, तिथे कोणतीही सुरक्षात्मक यंत्रणा किंवा बॅरिकेड्स लावण्यात आले नव्हते. मुसळधार पावसामुळे अस्लम शेख यांना उघड्या मॅनहोलचा अंदाज आला नाही आणि त्यांचा तोल जाऊन ते २५ फूट खोल मॅनहोलमध्ये कोसळले. सदर घटनेची माहिती मिळताच पालिका अधिकारी, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा वेग जास्त असल्याने शेख वाहून गेल्याची शक्यता वर्तवली जात होती; शोध मोहिमेदरम्यान त्यांची छत्री आणि चप्पलही सापडली. अखेर सुमारे चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाच्या जवानांना शेख यांना बाहेर काढण्यात यश आले, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

### मिलिंद नार्वेकर यांनी व्यक्त केला संताप

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे विधान परिषदेतील आमदार मिलिंद नार्वेकर यांनी एक्सवर एक सोशल मीडिया पोस्ट केली आहे. मुंबईतील साकीनाका येथे मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या घटनेबाबतची मिलिंद नार्वेकर यांची ती पोस्ट आहे. मॅनहोल दुर्घटना संतापजनक असून दोषी असलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे. या दुर्घटनेसाठी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना जबाबदार धरलं जाणं कितपत योग्य आहे, असा सवाल मिलिंद नार्वेकर यांनी केला आहे.

### उपमहापौर संजय घाडी यांची मागणी काय?

दुर्घटनेनंतर उपमहापौर संजय घाडी यांनी पालिका प्रशासनावर घणाघाती आरोप केले आहेत. निष्काळजीपणासाठी थेट महापालिका आयुक्त अश्विनी भिडे जबाबदार असून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी करत घाडी यांनी शिवसेना या मुद्द्यावर आक्रमक असल्याचा इशारा दिला. ज्यानंतर मिलिंद नार्वेकर यांनी अश्विनी भिडेंनाच कसं जबाबदार धरता येईल असा प्रश्न केला आहे.

# नागपुरात दुर्दैवी घटना! विजेचा धक्का लागून महिलेचा मृत्यू

महाईन्यूज । नागपूर

**रस्त्यावर तुटलेल्या वीजवाहिनीच्या संपर्कात आल्याने विजेचा धक्का लागून एका महिलेचा मृत्यू झाला. ताजबाग परिसरातील गौसिया कॉलनीत ही घटना घडली. दुर्दैवाची बाब म्हणजे महिलेचा मृतदेह दोन तास रस्त्यावरच पडून होता. ड्रेनेज लाईन खोदताना वीजेची तार बराच वेळ रस्त्यावरच पडून होती. ती हटवण्यासाठी कोणतीही पावले उचलण्यात आली नाही असा आरोप नागरिकांनी केला आहे.**



मुंबईतील रस्त्यावर पाणी साचल्याने विजेचा धक्का लागून एक महिला आणि मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा व्हिडिओ चर्चेत आला. त्या पार्श्वभूमीवर नागपुरातील या घटनेमुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

अफरोज बेगम (वय ७०) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या जबलपूर येथील रहिवासी होती व त्यांच्या पश्चात कुणीही नव्हते. त्या गौसिया कॉलनीतील बिसा बाबा दर्ग्याजवळ भाड्याच्या घरात राहत होत्या.

घरखर्च भागवण्यासाठी त्या मिळेल ते काम करायच्या. बुधवारी (१ जुलै) रात्री साधारण ९ वाजताच्या सुमारास त्या किराणा सामान आणण्यासाठी घरातून बाहेर पडल्या होत्या. त्यावेळी पाऊस पडत होता. चालताना त्यांचा पाय एका विद्युत प्रवाह सुरू असलेल्या तारेवर पडला. त्यामुळे शॉक बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

बराच वेळ कुणालाही हा प्रकार दिसलाच नाही. परिसरातील नागरिकांना जवळपास दोन तासांनंतर त्या निपचित पडलेल्या दिसल्या व त्यांचा मृत्यूच झाल्याचे स्पष्ट झाले.

या भागातील बहुतेक अंतर्गत रस्ते खराब अवस्थेत आहेत. दुरुस्तीसाठी वारंवार होणाऱ्या खोदकामामुळे त्यांची अवस्था आणखी बिकट होत आहे. त्यांचे डांबरीकरणही व्यवस्थित झालेले नाही. या भागातील ड्रेनेज लाईनचा मुद्दा यापूर्वीही चर्चेचा विषय ठरला होता. या घटनेमुळे आणि इतर समस्यांमुळे रहिवासी संतप्त झाले आहेत.

अमृत भारत योजनेअंतर्गत परिसरात गटार वाहिनीचे काम सुरू आहे. कापलेली पॉवर केबल आढळल्याने विद्युत अभियंत्याकडून अहवाल मागवण्यात आला आहे. यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे प्रतिपादन मनपाच्या मुख्य अभियंता लीना उपाध्याय यांनी केले.

### कठोर कारवाई करा

ही घटना संबंधित विभागांमधील समन्वयाच्या अभावाचा पुरावा आहे. महानगरपालिकेने लावलेल्या हाय-मास्ट लाईटची पॉवर केबल कापली गेल्याची कोणालाच माहिती कशी नव्हती? गुजरातस्थित एक कंपनी अमृत भारत योजनेअंतर्गत रस्त्याच्या मधून गटार वाहिन्या टाकत आहे. परिसरात केबल्स कोठे आणि कशा टाकल्या जात आहेत, याची माहिती प्रभागातील नगरसेवकालाही दिली जात नाही. लोकांचे जीवन धोक्यात आणणाऱ्या अशा निष्काळजी कामावर कठोर कारवाई झाली पाहिजे.

# इस्रोचे मुख्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी

## सुरक्षा यंत्रणांकडून संपूर्ण परिसर रिकामा; धमकी देणारा हा ईमेल कोणी पाठवला?

**महाईन्यूज । बंगळुरू**

**देशाची अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्था असलेल्या 'इस्रो'च्या (ISRO) बंगळुरू येथील मुख्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी आल्याने गुरुवारी एकच खळबळ उडाली. एका अज्ञात व्यक्तीने ईमेलद्वारे ही धमकी दिली होती. या ईमेलनंतर तातडीने पावले उचलत प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण इमारत रिकामी केली. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही.**



इस्रोच्या मुख्यालयाला धमकीचा ईमेल मिळताच सुरक्षा यंत्रणांची मोठी धावपळ उडाली. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक पोलीस, श्वान पथक (DOG SQUAD) आणि बॉम्बशोधक व नासधूस विरोधी पथकाने (BDDS) तात्काळ इस्रो मुख्यालय गाठले. सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ सर्व शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांना इमारतीबाहेर सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. त्यानंतर सुरक्षा पथकांनी संपूर्ण परिसराची कोनाकोपरा न कोनाकोपरा तपासला.

दरम्यान, इस्रोसारख्या संवेदनशील संस्थेला धमकी देणारा हा ईमेल नेमका कुठून आला आणि तो कोणी पाठवला, याचा शोध आता पोलिसांनी सुरू केला आहे. बंगळुरूमधील 'संजय नगर' पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायबर पोलिसांच्या मदतीने ईमेलचा आयपी ॲड्रेस (IP ADDRESS) आणि इतर तांत्रिक बाबींची पडताळणी केली जात आहे. देशपातळीवर नामांकित असलेल्या संस्थेला अशाप्रकारे लक्ष्य केल्यामुळे पोलीस या प्रकरणाचा अत्यंत गांभीर्याने तपास करत आहेत.

गुरुवारी इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्या कार्यालयाला धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. खबरदारीचा उपाय म्हणून मुख्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने इमारतीबाहेर काढण्यात आले. बंगळुरू पोलीस, श्वान पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकाने संपूर्ण परिसर पिंजून काढला. सुदैवाने, या तपासणीत कोणतीही स्फोटक वस्तू आढळली नाही आणि ही धमकी खोटी असल्याचे स्पष्ट झाले. बंगळुरूचे संजय नगर पोलीस ठाणे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी निशांत त्यागी याने २९ जून रोजी देशातील अनेक संवेदनशील संस्थांना ईमेल पाठवले होते. पोलिसांनी ईमेलच्या 'डिजिटल ट्रेल'चा माग काढत दोन संशयास्पद ईमेल अकाऊंट्सचे विश्लेषण केले. या अकाऊंट्सशी लिंक असलेला मोबाईल नंबर पोलिसांच्या हाती लागला आणि ३० जून रोजी पोलिसांनी गाझियाबादच्या संयोग नगर येथील त्याच्या घरावर छापा टाकून त्याला पकडले.

प्राथमिक तपासात समोर आले आहे की, ३६ वर्षीय आरोपी निशांत त्यागी हा २००८ पासून गंभीर मानसिक आजाराने ग्रस्त असून त्याच्यावर विविध वैद्यकीय संस्थांमध्ये उपचार सुरू आहेत. त्याच्या कुटुंबीयांनीही पोलिसांना त्याच्या वैद्यकीय इतिहासाचे दस्तऐवज सादर केले आहेत. त्याने ओपन स्कूलिंगमधून शालेय शिक्षण पूर्ण केले होते आणि २०१० मध्ये पदवीसाठी प्रवेश घेतला होता, मात्र तो अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही. त्याच्या घराची झडती घेतली असता कोणतेही स्फोटक साहित्य पोलिसांना मिळालेले नाही.

### धमकीचा ईमेल ठरला 'फेक'

या संपूर्ण शोधमोहिमेबाबत माहिती देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, "धमकीचा ईमेल आल्यानंतर आम्ही कोणतीही जोखीम न पत्करता तात्काळ शोधमोहीम राबवली. मात्र, संपूर्ण तपासणीत आवारात कोणतीही संशयास्पद किंवा स्फोटक वस्तू सापडलेली नाही. त्यामुळे हा धमकीचा ईमेल खोटा असल्याचे स्पष्ट झाले असून नागरिकांनी किंवा कर्मचाऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही." आरोपीने केवळ इस्रोलाच नाही, तर देशाच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या संस्थांना बॉम्बने उडवण्याची धमकी दिली होती.

# मोजतबा खामेनी यांच्या सुरक्षेबाबत भारतातील प्रतिनिधीचा मोठा खुलासा

**महाईन्यूज । इराण**

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अंत्यविधी येत्या दोन-तीन दिवसांत पार पडणार आहे. यासाठी भारतातून नेत्यांना हजर राहण्याची विनंती केली असताना, खामेनी यांचे पुत्र मोजतबा खामेनीच अंत्यविधीला उपस्थित राहण्याची शक्यता फार कमी आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मोजतबा वडील अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यविधीला गैरहजर राहतील, अशी माहिती खामेनी यांचे भारतातील प्रतिनिधी, अयातुल्ला हकीम इलाही यांनी दिली आहे.**



अयातुल्ला हकीम इलाही यांनी नुकतेच 'इंडिया टुडे'ला एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत बोलताना इलाही यांनी मोजतबा खामेनी वडील अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहू शकणार नाहीत, अशी माहिती त्यांनी दिली. इस्रायलबरोबर अद्याप संबंध तणावपूर्ण असल्याने इलाही यांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली. "मी गेल्या आठवड्यात इराणमध्ये होतो, मी तिथं मित्रांना भेटोलो ज्यांनी मोजतबा यांची भेट घेतली आहे. त्यांनी सांगितले की त्यांना बाहेर येऊन लोकांना भेटायचे आहे, पण सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना बाहेर येऊ दिले जाणार नाही", असे इलाही म्हणाले.

जगभरातून लोक अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येत आहेत आणि हे आम्ही कधी विसरणार नाही, असे इलाही म्हणाले. "लोक आम्हाला धीर देण्यासाठी येत आहेत, ते आम्ही तुमच्याबरोबर आहोत हे सांगण्यासाठी येत आहेत. आम्ही तुम्हाला कधी विसरणार नाही", असे इलाही म्हणाले. "अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू इराणचे मोठे नुकसान आहे आणि हे नुकसान कधीही न भरुन निघणारे आहे", असेही इलाही पुढे म्हणाले.

दरम्यान, अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर इराणमधील राजकीय आणि धार्मिक वातावरण अधिक संवेदनशील बनले आहे. देशभरात विविध ठिकाणी श्रद्धांजली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. सुरक्षा यंत्रणांनी संभाव्य धोके लक्षात घेऊन राजधानीसह महत्त्वाच्या शहरांमध्ये सुरक्षा व्यवस्थेत मोठी वाढ केली आहे.

### अंत्यविधीला जगभरातून येणार लोक येणार असल्याचा दावा

मित्रांनी मला सांगितले हे खूप धोकादायक आहे आणि आपण त्यांना सुरक्षा देऊ शकत नाही, मला असं वाटतं की ते बाहेर पडणार नाहीत. असे इलाही यांनी पुढे स्पष्ट केले. अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यदर्शनासाठी जगभरातून हजारो नागरिक आणि दिग्गज हजेरी लावण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इस्रायल यांच्याशी संबंध तणावपूर्ण स्थितीत असताना अंत्यविधी पार पडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. अयातुल्ला यांच्या मृत्यूमुळे इराणचे मोठे नुकसान झाल्याचे इलाही इंडिया टुडेशी बोलताना म्हणाले.

# नेहा धुपिया पापाराझींवर भडकली



अभिनेत्री नेहा धुपिया (Neha Dhupia) नुकतेच एका इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. मात्र यावेळी तिने पापाराझींना चांगलेच सुनावले आहे. त्यांचं झालं असं की, नेहा मुंबईतील एका भव्य पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी पोहोचली होती. कार्यक्रम संपल्यानंतर जेव्हा ती बाहेर पडत होती, तेव्हा काही फोटोग्राफर्स मागून तिचे फोटो आणि व्हिडिओ काढू लागले. हे पाहताच नेहाचा पारा चढला आणि तिने लगेचच फोटोग्राफर्सना त्यांच्या या पद्धतीवर संताप व्यक्त केला. सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये नेहा म्हणते, “हा कसला उद्धटपणा आहे, मागून (Back Shot) फोटो घेतला जात आहे. कोण घेतोय? हे सगळं बंद करा. माझेच नाही, तर इतर कोणाचेही असे फोटो काढायचे नाहीत. आम्ही सगळे सांगून सांगून थकलो आहोत. कधी बॅग समोर पकडून, कधी पुस्तक आडवे धरून, तर कधी उलटे चालून आम्हाला स्वतःचा बचाव करावा लागतो. हे सर्व आता चालणार नाही. हे लगेच बंद करा. आम्ही तुमच्याशी खूप आदराने बोलतो, त्यामुळे तुम्हीही असे वागू नका.” नेहाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. तिच्या या भूमिकेला सर्वांचं पाठिंबा दिला आहे. नेहाप्रमाणे याआधी देखील या मुद्यावरुन अनेक अभिनेत्रींनी पापाराझींना खडेबोल सुनावले होते. दरम्यान, सेलिब्रिटी आणि पापाराझी यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून परस्पर आदराचे एक घट्ट नाते निर्माण झाले आहे.




# प्रवीण तरडेंची अनोखी शक्कल ठरली गेमचेंजर

मराठी चित्रपटसृष्टीत पुन्हा एकदा इतिहास घडला आहे. प्रवीण तरडे दिग्दर्शित ‘देऊळ बंद २’ या सिनेमाने तब्बल १०० कोटींचा टप्पा पार करत मोठा माईलस्टोन गाठला आहे. कमी बजेटमध्ये तयार झालेला हा सिनेमा मराठीत १०० कोटी कमावणाऱ्या मोजक्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे. पण हा आकडा इतका सहज आलेला नाही त्यामागे आहे वेगळ्या विचारांची, स्ट्रॅटेजीची आणि प्रचंड मेहनतीची कहाणी. स्वतः प्रवीण तरडे यांनी याबद्दल खुलासा केला आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत प्रवीण तरडेंनी या यशामागचं खरं गुपित उलगडलं. त्यांच्या मते, “फक्त पारंपरिक बॉक्स ऑफिसवर अवलंबून न राहता नवीन आयडिया आणि वितरणाचे वेगळे मार्ग स्वीकारणं” हेच या यशाचं मुख्य कारण होतं. चित्रपटाने थिएटर रिलीजसोबतच अनेक नवे प्रयोग केले. ज्या भागात चित्रपटगृहे उपलब्ध नाहीत, तिथे खास ‘तंबू थिएटर’ उभारून अत्यल्प तिकीट दरात शो आयोजित करण्यात आले. या अनोख्या प्रयोगातून सुमारे साडेचार कोटींचं कलेक्शन झाल्याचं ते सांगतात. तसेच ज्या भागात थिएटर नाही तिथे स्वामींच्या सेवाकेंद्रात जाऊन आम्ही २५,३०,४० रुपयांत सिनेमा दाखवला. याशिवाय ‘देऊळ बंद २’ने जागतिक स्तरावरही जोरदार कामगिरी केली. अमेरिकेत सर्वाधिक शो झाले, तर जर्मनी, कॅनडा, जपान, सिंगापूर, नेदरलँड आणि दुबई यांसारख्या देशांमध्येही विशेष स्क्रीनिंग्ज घेण्यात आले. परदेशातील या शोमधून जवळपास साडेसात ते आठ कोटी रुपयांचं कलेक्शन मिळालं. प्रवीण तरडेंनी चित्रपटाच्या रिलीजनंतर जवळपास ५० दिवस सतत देशभरातील थिएटरला भेटी दिल्या. कोणत्याही मोठ्या टीमशिवाय, मोबाईल हातात घेऊन ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचले. प्रत्येक शोला उपस्थित राहून त्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला, फोटो घेतले आणि चित्रपटाबद्दल थेट फीडबॅक घेतला. “हे यश अचानक मिळालेलं नाही,” असं ते स्पष्टपणे सांगतात. पारंपरिक चौकटीबाहेर जाऊन केलेले प्रयोग, प्रेक्षकांपर्यंत थेट पोहोचण्याची रणनीती आणि सातत्यपूर्ण मेहनत या सगळ्यांच्या जोरावर ‘देऊळ बंद २’ने १०० कोटींचा टप्पा पार केला. मराठी सिनेमासाठी हा केवळ व्यावसायिक यशाचा नाही, तर नवीन मॉडेल तयार करणारा टप्पा मानला जात आहे.

# ब्रेकअपच्या चर्चांना पूर्णविराम!



बॉलिवूड अभिनेत्री कृती सेनन (Kriti Sanon) पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. गेल्या काही दिवसांपासून कृती आणि तिचा कथित बॉयफ्रेंड कबीर बहिया यांच्या ब्रेकअपच्या चर्चा सोशल मीडियावर जोरात सुरू होत्या. मात्र, आता कृतीने स्वतः सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका खास फोटोमुळे या चर्चांना मोठ्या प्रमाणात पूर्णविराम मिळाल्याचे मानले जात आहे. 2026 य । वर्षातील पहिले सहा महिने पूर्ण झाल्यानिमित्त कृतीने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर ‘हाफ इयरली फोटो डंप’ शेअर केला. या पोस्टमध्ये तिने गेल्या काही महिन्यांतील अनेक खास आठवणी चाहत्यांसोबत शेअर केल्या आहेत. या फोटोंमध्ये कुटुंब, मित्र, प्रवास आणि कामाशी संबंधित अनेक क्षण पाहायला मिळतात. मात्र, सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते कबीर बहियासोबतच्या तिच्या एका फोटोने. या पोस्टसोबत कृतीने एक खास कॅप्शनही लिहिले. ती म्हणाली, “हाफ इयरली डंप! काही असे क्षण जे कधी इन्स्टाग्रामवर आले नाहीत आणि काही असे क्षण जे कदाचित कधीच समोर येणार नाहीत.” या कॅप्शनमुळे तिच्या पोस्टबद्दल चाहत्यांमध्ये आणखी उत्सुकता निर्माण झाली. काही दिवसांपूर्वी कबीर बहियाचा एका रहस्यमय तरुणीसोबतचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर कृती आणि कबीर यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा सुरू झाल्या. दोघांचे ब्रेकअप झाल्याचा दावा अनेक सोशल मीडिया पोस्टमध्ये करण्यात आला होता. मात्र, कृतीने आता स्वतः कबीरसोबतचा फोटो शेअर केल्यामुळे या अफवांना मोठा धक्का बसला आहे. तथापि, कृती सेनन आणि कबीर बहिया यांनी त्यांच्या नात्याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. त्यामुळे दोघे रिलेशनशिपमध्ये आहेत की नाहीत, याबाबत कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. सध्या सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चा या केवळ अंदाज आणि अफवांच्या आधारेच सुरू आहेत. व्हायरल झालेल्या या फोटोमध्ये कबीर बहिया आयव्हरी रंगाच्या भरतकाम केलेल्या शेरवानीमध्ये दिसत आहे, तर कृतीने काळ्या रंगाची हुडी परिधान केली आहे. तिच्या हुडीवर लिहिलेला “Emotionally Invested, Financially Broke” हा मजेशीर संदेशही अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे. या फोटोवर चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या असून, अनेकांनी या जोडीचे कौतुक केले आहे. दरम्यान, कृतीच्या व्यावसायिक आयुष्याबद्दल बोलायचे झाल्यास, तिच्यासाठी हा काळही खूप चांगला ठरत आहे.

# FIFAची बक्षिसांची बरसात!

## विजेत्यापासून राऊंड ऑफ ३२ पर्यंत प्रत्येक टप्प्यासाठी कोट्यवधींची बक्षिसे

**महाईन्यूज** । लंडन

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेतील राऊंड ऑफ ३२ फेरीतील सामने सुरू आहेत. लवकरच राऊंड ऑफ १६ फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे. या स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ४८ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे बक्षिसाची रक्कमही मोठी असणार आहे. दरम्यान विजेता, उपविजेता आणि नॉकआऊट फेरीत प्रवेश करणाऱ्या संघांना किती रक्कम मिळणार? जाणून घ्या.**






यावेळी फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी बक्षिसाची रक्कम ही वाढवण्यात आली आहे. आधी ही रक्कम ७२७ मिलियन डॉलर्स इतकी होती. पण एप्रिल महिन्यात फिफाकडून बक्षिसाची रक्कम वाढवण्यात आली होती. ही रक्कम ७२७ मिलियन डॉलर्सपर्यंत जाऊन पोहोचली आहे.

फिफा वर्ल्डकप जिंकणाऱ्या संघाला ५१ मिलियन डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार ४३३ कोटी रुपये मिळतील. तर उपविजेत्या संघाला ३४ मिलियन डॉलर्स (२८९ कोटी रुपये) मिळणार आहेत. तर या स्पर्धेत तिसऱ्या स्थानी राहणाऱ्या संघाला ३० मिलियन डॉलर्स (२५५ कोटी रुपये) तर चौथ्या स्थानी राहणाऱ्या संघाला २८ मिलियन डॉलर्स (२३८ कोटी रूपये) इतकी रक्कम मिळणार आहे.


या स्पर्धेतील टॉप ८ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला २० मिलियन डॉलर्स (१७० कोटी रुपये) मिळणार आहेत. तर राऊंड ऑफ १६ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला १६ मिलियन डॉलर्स (१३६ कोटी रुपये) तर राऊंड ऑफ ३२ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला १२ मिलियन डॉलर्स (१०२ कोटी रूपये) मिळणार आहेत. तर जे संघ राऊंड ऑफ ३२ मध्ये मध्ये प्रवेश करू शकले नव्हते, अशा संघांना १० मिलियन डॉलर्स ( ८५ कोटी रुपये) मिळणार आहेत. आतापर्यंत झालेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासातील ही सर्वोच्च रक्कम आहे.

यासह फिफाकडून सर्व ४८ संघांना १६८ मिलियन डॉलर्स दिले जाणार आहेत. प्रत्येक संघाला २.५ मिलियन डॉलर तयारीसाठी, सरावासाठी, प्रवासाचा खर्च आणि इतर खर्चासाठी दिले जाणार आहेत. यासह अतिरिक्त भत्ता दिला जाणार आहे. त्यामुळे वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या प्रत्येक संघाला १२.५ मिलियन डॉलर्स म्हणजे १०६ कोटी मिळणार आहेत.

# शाहरुख खान आणि केकेआरने उभारलं स्वत:चं स्टेडियम

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या शाहरुख खान आणि त्याच्या नाईट रायडर्स संघाने शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. शाहरुख खान आणि नाईट रायडर्स यांनी स्वत:च्या मालकीचं स्टेडियमच उभारलं आहे. नाईट रायडर्स ग्रुप अर्थात केआरजीने कॅलिफोर्नियातल्या पोमोनो इथल्या स्टेडियमचं अनावरण केलं.**



कॅरेबियन प्रीमिअर लीग स्पर्धेत शाहरुखच्या मालकीचा लॉस एंजेलिस नाईट रायडर्स हा संघ आहे. या मैदानात लॉस एंजेलिस संघाचे सामने खेळवण्यात येतील. अमेरिकेत क्रिकेट प्रसार आणि प्रचाराच्या दृष्टीने हे स्टेडियम महत्त्वाचं ठरणार आहे. २०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेतही या मैदानावर सामने आयोजित केले जाणार आहेत.

शाहरुख खानने सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना या स्टेडियमची माहिती दिली. प्रदीर्घ काळापासूनचं एक स्वप्न प्रत्यक्षात साकारलं आहे. स्वत:च्या संघाचं स्टेडियम असावं अशी अनेक वर्ष इच्छा होती. हा क्षण प्रत्यक्षात साकारणं माझ्यासाठी भावनिक आहे असं शाहरुखने सांगितलं. फक्त क्रिकेट चाहत्यांसाठी नव्हे तर हे स्टेडियम मनोरंजनाचं केंद्र असेल असं शाहरुखने म्हटलं आहे. या स्टेडियमच्या उभारणीत सहकार्य केल्याबद्दल शाहरुखने आयसीसीचे अध्यक्ष जय शहा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांनी सांगितलं.

आयपीएलच्या धर्तीवर सुरू झालेल्या कॅरेबियन प्रीमिअर लीग स्पर्धेत सुरुवातीपासूनच नाईट रायडर्स समूहाचा संघ आहे. या संघाला आता हक्काचं होम ग्राऊंड मिळालं आहे. या मैदानावर मेजर लीग क्रिकेट टी२० लीगचे सामने होणार आहेत. पोमोनातल्या फेअरप्लेक्स इथे हे मैदान आहे.

आयपीएल स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्स, ILT20 स्पर्धेत अबू धाबी नाईट रायडर्स, मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत लॉस एंजेलिस नाईट रायडर्स यांच्यासह कॅरेबियन प्रीमिअर लीग स्पर्धेत त्रिनबागो नाईट रायडर्स या संघांची मालकी नाईट रायडर्स संघाकडे आहे. १० एकरवर पसरलेल्या या स्टेडियमच्या उभारणीसाठी २१ मिलिअन डॉलर्स इतका खर्च करण्यात आला आहे. फक्त क्रिकेट सामन्यांच्या आयोजनासाठी म्हणून तयार करण्यात आलेलं टेक्सासमधल्या ग्रँड प्राअरी नंतरचं हे पहिलंच स्टेडियम आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। शुक्रवार ।
दि. 03 जुलै 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला आणखी विलंब नको!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचा पहिला टप्पा जुलै महिन्यात, तर दुसरा टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी भाजप आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो सेवा १५ जुलै २०२६ पासून सुरू होईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली होती. मात्र, प्रत्यक्षात कामाची गती पाहता ही मुदतही पाळली जाण्याची शक्यता कमी असल्याचे शिरोळे यांनी सभागृहात निदर्शनास आणून दिले. या प्रकल्पासाठी गेल्या काही वर्षांत अनेक वेळा उद्घाटनाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या. सुरुवातीला मार्च २०२३, त्यानंतर मार्च २०२५, एप्रिल २०२६ मध्ये ९४ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा, त्यानंतर ३१ मे २०२६ आणि आता १५ जुलै २०२६ अशी नवी डेडलाइन देण्यात आली. मात्र, आजपर्यंत जाहीर करण्यात आलेली एकही मुदत पूर्ण झालेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मेट्रो प्रकल्प रखडल्यामुळे हिंजवडी आयटी पार्क, बाणेर, बालेवाडी, औंध आणि शिवाजीनगर परिसरातील लाखो नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून पहिला टप्पा जुलैमध्ये आणि दुसरा टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू करण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर हिंजवडी आयटी पार्कसह पश्चिम पुण्यातील वाहतूक कोंडी कमी होऊन लाखो प्रवाशांचा वेळ आणि इंधनाची बचत होईल, तसेच शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही आमदार शिरोळे यांनी व्यक्त केला.

## मेट्रो अद्याप रखडली

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पासाठी मार्च २०२३, मार्च २०२५, मे २०२६ आणि १५ जुलै २०२६ अशा अनेक मुदती जाहीर करण्यात आल्या. मात्र, एकही डेडलाइन पूर्ण झाली नाही. त्यामुळे उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून मेट्रो सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला गती!

## सोसायट्यांनी BLO ला सहकार्य करण्याचे PCCHSFचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (SPECIAL INTENSIVE REVISION – SIR) २०२६ मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत पडताळणी पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट करत पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीज फेडरेशन (PCCHSF) ने सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव आणि व्यवस्थापन समित्यांना निवडणूक आयोगाच्या BOOTH LEVEL OFFICER (BLO) यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.**



महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पिंपरी-चिंचवड निवडणूक प्रशासन आणि जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या समन्वयाने ३० जून रोजी झालेल्या अधिकृत बैठकीला PCCHSF चे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी निवडणूक अधिकाऱ्यांनी SIR ही कायदेशीर आणि वेळबद्ध प्रक्रिया असल्याचे स्पष्ट करत प्रत्येक नोंदणीकृत मतदाराने निर्धारित कालावधीत पडताळणी पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

Pre-SIR प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत BLO मार्फत घराघर जाऊन मतदार पडताळणी सुरू झाली आहे. प्रत्येक घराला भेट देऊन मतदारांची माहिती पडताळली जाणार असून, सोसायटी व्यवस्थापनाने BLO अधिकाऱ्यांना प्रवेश देऊन पडताळणी प्रक्रिया सुलभ करावी, तसेच रहिवाशांना आवश्यक कागदपत्रांसह उपलब्ध राहण्याबाबत पूर्वसूचना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवडणूक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या भेटीत मतदार उपलब्ध नसल्यास BLO अधिकाऱ्यांकडून जास्तीत जास्त तीन वेळा भेट दिली जाऊ शकते. प्रत्येक भेटीची अधिकृत नोंद, पुरावे आणि पंचनामा तयार केला जाणार आहे. तीनही भेटीनंतरही पडताळणी पूर्ण न झाल्यास निवडणूक आयोगाच्या नियमानुसार संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, पात्र मतदारांनी घरपोच पडताळणीबरोबरच Election Commission of India (ECI) च्या Voter Portal वरूनही ऑनलाइन पडताळणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकृत वेळापत्रकानुसार २९ जुलैपर्यंत घरपोच पडताळणी आणि मतदान केंद्रांचे पुनर्संरचना, ५ ऑगस्ट रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध होणार असून, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबरदरम्यान दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

PCCHSF ने सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था, पदाधिकारी आणि नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवत वेळेत SIR पडताळणी पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाला संपूर्ण सहकार्य करण्याचे आवाहनही केले आहे.

> मतदानाचा हक्क हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत लोकशाही अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने २९ जुलैपूर्वी SIR पडताळणी पूर्ण करावी. सर्व सोसायट्यांनी BLO अधिकाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून ही प्रक्रिया सुरळीत पार पाडावी. वेळेवर केलेली पडताळणी प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवेल आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यास हातभार लावेल.
>
> **- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीज फेडरेशन.**

## ‘पवना बंद जलवाहिनी’ प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करा; आमदार शंकर जगताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता, शहराच्या दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला ‘पवना बंद जलवाहिनी प्रकल्प’ विहित कालमर्यादेत आणि तातडीने पूर्ण करावा, अशी आग्रही मागणी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी गुरुवारी विधिमंडळात ‘औचित्याच्या मुद्द्या द्वारे’ केली. या रखडलेल्या प्रकल्पासाठी शासनाने विशेष निधी आणि आवश्यक प्रशासकीय मंजुऱ्या जलद गतीने उपलब्ध करून द्याव्यात, याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.**



आमदार शंकर जगताप यांनी सभागृहात शहराच्या पाण्याच्या प्रश्नावर बोलताना सांगितले की, पवना धरण ते निगडी सेक्टर-२३ जलशुद्धीकरण केंद्रादरम्यान सुमारे ३६ किलोमीटर लांबीची आणि १८०० मिमी व्यासाची बंद जलवाहिनी उभारण्यासाठी सन २००८ मध्ये ३९७.९२ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मात्र, स्थानिक आंदोलन, जमीन संपादनातील अडचणी, प्रशासकीय व तांत्रिक अडथळे, तसेच विविध न्यायालयीन व लवाद प्रक्रियांमुळे हा प्रकल्प गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ रखडला आहे.

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले , सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला पवना धरणातून दररोज सुमारे ५१० ते ५३० एमएलडी पाणीपुरवठा होतो. हा बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण झाल्यास खुल्या कालव्यातून आणि पात्रातून होणारे बाष्पीभवन, पाण्याची गळती व अनधिकृत पाणीउपसा पूर्णपणे रोखता येईल. यामुळे शहराला अतिरिक्त सुमारे १०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार असून, वार्षिक अंदाजे १.२९ टीएमसी पाण्याची मोठी बचत होईल. शहराचे भविष्यातील संभाव्य पाणीसंकट टाळण्यासाठी हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहे.

> पिंपरी-चिंचवडकरांना पुरेसे आणि हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी विशेष निधी मंजूर करावा आणि शासनाने एका निश्चित कालमर्यादेत हे काम पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी मी केली आहे. या प्रकल्पाचा पाठपुरावा मी सातत्याने करत राहीन.
>
> **– शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.**



### १५ वर्षांत फक्त ४.५ ते ८ किमीचे काम!


या प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे १७१ ते २०० कोटी इतका खर्च झाला असून, केवळ ४.५ ते ८ किलोमीटरपर्यंतचेच जलवाहिनीचे काम पूर्ण होऊ शकले आहे. तर सुमारे २८ ते ३२ किलोमीटरचे काम अद्याप प्रलंबित आहे. अनेक वर्षांच्या विलंबामुळे आणि वाढत्या बांधकाम खर्चामुळे या प्रकल्पाची सुधारित अंदाजित किंमत आता तब्बल १,२०० ते १,७०० कोटींवर पोहोचली आहे. हा वाढीव खर्च महापालिकेच्या आवाक्याबाहेर असल्याने शासनाने यासाठी विशेष आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.

# बिल्डरांच्या चुकांची शिक्षा रहिवाशांना नको

## सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रकरणी सोसायटी फेडरेशनचा सरकारला इशारा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) अकार्यक्षम असल्याच्या कारणावरून गृहनिर्माण सोसायट्यांवर कारवाई करण्याच्या निर्णयाला चिखली-मोशी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी फेडरेशनने तीव्र विरोध दर्शविला आहे. बिल्डरांच्या निष्काळजीपणाची शिक्षा हजारो रहिवाशांना देणे अन्यायकारक असून, कारवाई सोसायट्यांवर नव्हे तर नियमभंग करणाऱ्या बिल्डर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर व्हावी, अशी ठाम भूमिका फेडरेशनने मांडली आहे.**



फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी सांगितले की, अनेक विकासकांनी कार्यक्षम एसटीपी न बसवता किंवा निकृष्ट दर्जाच्या तसेच अपुऱ्या क्षमतेच्या यंत्रणा बसवूनही प्रकल्पांचे पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळवले. अनेक ठिकाणी कार्यान्वित एसटीपी सोसायट्यांकडे हस्तांतरितच करण्यात आले नाहीत. त्यामुळे आज रहिवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रकल्प हस्तांतरित करण्यापूर्वी कार्यरत एसटीपी बसवणे आणि तो व्यवस्थित स्थितीत सोसायटीच्या ताब्यात देणे ही पूर्णपणे बिल्डरची जबाबदारी आहे. मात्र, ही जबाबदारी न पाळणाऱ्या बिल्डरांवर कारवाई करण्याऐवजी महापालिका थेट सोसायट्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्याचा मार्ग स्वीकारत आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

सांगळे यांनी निदर्शनास आणून दिले की, हा विषय यापूर्वीही राज्य विधिमंडळात उपस्थित झाला होता. त्यावेळी प्रकल्प हस्तांतरित झाल्यानंतरही पुढील पाच वर्षे एसटीपीची देखभाल आणि संचालन करण्याची जबाबदारी बिल्डरांवर टाकण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावर सरकारने सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची अंमलबजावणी न करता आता थेट गृहनिर्माण सोसायट्यांवर कारवाईचे निर्देश दिले जात आहेत.

फेडरेशनने सरकारकडे मागणी केली आहे की, एसटीपी संदर्भातील प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषी बिल्डर, प्रकल्पांना मंजुरी देणारे अधिकारी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. निरपराध रहिवाशांचा पाणीपुरवठा खंडित करण्याऐवजी मूळ दोषींना जबाबदार धरल्यासच पर्यावरणीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी होईल आणि नागरिकांनाही न्याय मिळेल, अशी भूमिका फेडरेशनने स्पष्ट केली आहे.

> “ पर्यावरण संरक्षणासाठी एसटीपी कार्यान्वित असणे आवश्यक आहे, याबाबत आमचा कोणताही विरोध नाही. मात्र, कार्यक्षम एसटीपी न बसवता किंवा निकृष्ट दर्जाच्या यंत्रणा देऊन प्रकल्पांचे पूर्णत्व प्रमाणपत्र मिळवणाऱ्या बिल्डरांवर कारवाई करण्याऐवजी हजारो रहिवाशांचा पाणीपुरवठा खंडित करणे हा अन्याय आहे. सरकारने सोसायट्यांना दोषी धरण्याऐवजी नियमभंग करणारे बिल्डर, संबंधित अधिकारी आणि मंजुरी प्रक्रियेतील त्रुटींची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. रहिवाशांना वेठीस धरण्याऐवजी मूळ जबाबदारांवर कारवाई झाली, तरच पर्यावरणीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी होईल आणि नागरिकांनाही न्याय मिळेल.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी फेडरेशन.**

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे दंत आरोग्य जनजागृती सत्र संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



डॉक्टर दिनाचे औचित्य साधून प्रियदर्शनी स्कूल, मोशीच्या प्री-स्कूल विभागातील विद्यार्थ्यांसाठी दंत आरोग्य जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. हे मार्गदर्शन सत्र डॉ. शाहीन व्ही. वळसंगकर (BDS) यांनी अतिशय सोप्या व आकर्षक पद्धतीने घेतले.

डॉ. वळसंगकर यांनी विद्यार्थ्यांना दातांची स्वच्छता राखण्याचे महत्त्व, योग्य पद्धतीने दात घासण्याची पद्धत तसेच दात निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या चांगल्या आहाराच्या सवयी याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी दैनंदिन जीवनात चांगल्या दंत स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे महत्त्व पटवून दिले.

विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले आणि आनंदाने उपक्रमात सहभागी झाले. लहान वयापासूनच दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरले.

या प्रसंगी प्रियदर्शनी स्कूलतर्फे डॉ. शाहीन व्ही. वळसंगकर यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. डॉक्टर दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी सवयी रुजविण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

# रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय समन्वय समितीवर विलास लांडे यांची नियुक्ती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



**देशातील अग्रगण्य रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय समन्वय समितीवर माजी आमदार तथा राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विलास लांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या अनुभवाचा संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

विलास लांडे यांनी शिक्षण, समाजकारण आणि लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव, प्रभावी नेतृत्व आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोनामुळे पश्चिम महाराष्ट्रातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध उपक्रमांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुभेच्छा संदेशात, विलास लांडे यांची नियुक्ती ही त्यांच्या शैक्षणिक नेतृत्वाची आणि समाजहितासाठी केलेल्या योगदानाची गौरवपूर्ण दखल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, नव्या जबाबदारीतून ते संस्थेच्या गुणवत्ता वृद्धी, शैक्षणिक विस्तार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी योगदान देतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय समन्वय समितीवर झालेल्या या नियुक्तीमुळे शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, विविध स्तरांतून विलास लांडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
NBA
AUTONOMOUS
NAAC
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station